Toppersnotes®
Unleash the topper in you

# MPSC

## राज्यसेवा पूर्व एवं मुख्य परीक्षा

## महाराष्ट्र लोक सेवा आयोग

### सामान्य अध्ययन

पेपर 2

# भारताचे संविधान

SIERRA INNOVATIONS

# Maharastra - PSC

## भारताचे संविधान


| क्र.सं. | अध्याय | पृष्ठ सं. |
|---|---|---|
| 1. | संविधान निर्मितीची प्रक्रिया | 1 |
| 2. | ऐतिहासिक पार्श्वभूमी | 3 |
| 3. | राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट्ये | 8 |
| 4. | घटनेची प्रस्तावना | 12 |
| 5. | मूलभूत हक्क | 16 |
| 6. | मूलभूत कर्तव्ये | 20 |
| 7. | राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे | 23 |
| 8. | केंद्र व त्याचा प्रदेश | 27 |
| 9. | घटनेचा मूळ गाभा | 29 |
| 10. | घटनादुरुस्ती | 31 |
| 11. | नागरिकत्व | 33 |
| 12. | घटनात्मक संस्था/आयोग | 38 |
| 13. | राष्ट्रपती | 46 |
| 14. | पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्रिमंडळ | 49 |
| 15. | भारतीय संसद | 52 |
| 16. | राज्यपाल | 64 |
| 17. | मुख्यमंत्री आणि राज्य मंत्रिमंडळ | 67 |
| 18. | राज्य विधिमंडळ | 69 |
| 19. | सर्वोच्च न्यायालय | 74 |
| 20. | उच्च न्यायालय | 77 |

| | | |
|---|---|---|
| 21. | गौण न्यायालय/जिल्हा न्यायालय आणि लोक अदालत | 79 |
| 22. | लोकपाल आणि लोकायुक्त | 83 |
| 23. | पंचायत राज व्यवस्था | 87 |
| 24. | शिक्षण प्रणाली | 90 |
| 25. | प्रसारमाध्यमे | 94 |
| 26. | विविध महत्त्वाचे कायदे | 98 |
| 27. | सामाजिक सुरक्षा व सामाजिक कायदे | 107 |
| 28. | सार्वजनिक धोरण, नियोजन, अंमलबजावणी, मूल्यमापन, विश्लेषण | 111 |
| 29. | लोकप्रशासनातील संकल्पना, दृष्टीकोन आणि सिद्धांत | 121 |

# संविधान निर्मितीची प्रक्रिया

* **मागणी**

→ प्रथम – एम एन रॉय – 1934

→ भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस – 1935 (औपचारिक)

→ 1938 साली पं. नेहरूंनी कॉंग्रेसच्या वतीने मला या मागणीस मुर्त स्वरूप दिले.

→ 1940 मध्ये 'ऑगस्ट ऑफर' मार्फत घटना समितीची मागणी मान्य.

→ मुस्लीम लीग तर्फे 2 स्वतंत्र घटना समितीची मागणी.

* **स्वरूप**

→ कॅबिनेट मिशन प्लॅनच्या शिफारसीने, 1946 साली घटना समिती स्थापित.

→ ज्यामध्ये एकूण सदस्य संख्या 389 इतकी होती. यापैकी 296 जागा ह्या ब्रिटीश भारताला तर 93 जागा संस्थानाला.

→ प्रत्येक प्रांत, रियासत, त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व.

→ प्रत्येक समुदायाचे प्रतिनिधी प्रांतीय विधान-सभेत, त्या समुदायाच्या सदस्याद्वारे निवडले जातील (एकल हस्तांतरणीय मतदान पद्धत).

→ संस्थानांचे प्रतिनिधी हे तेथील प्रमुखाद्वारे नामनिर्देशित

→ त्यामुळे हे स्पष्ट की संविधान सभा ही अंशत: निवडून तर अंशत: नामनिर्देशित होती.

* **कामकाज**

→ 9 डिसेंबर 1946 – पहिली बैठक.
(मुस्लीम लीगाचा बहिष्कार)

→ सच्चिदानंद सिन्हा यांची हंगामी अध्यक्ष म्हणून निवड (फ्रेंच पद्धत)

→ 13 डिसेंबर 1946 – उद्देशांचा ठराव.
(पं. नेहरू).

→ उद्देशांचा ठरावामध्ये काही बदल करून तो घटनेच्या प्रस्तावनेत समाविष्ट केला आहे

* **स्वातंत्र्य कायदा 1947 मधील बदल**

→ या बदलानुसार संविधान सभा सार्वभौम बनली

→ ब्रिटीश कायदा रद्द किंवा बदल करण्याचा अधिकार.

→ संविधान सभा हीच पहिली विधानसभा बनली

→ ज्यामध्ये स्वतंत्र भारतासाठी कायदे बनवणे व राज्यघटना तयार करणे ही प्रमुख कामे होती.

→ संविधान सभा जेव्हा घटनानिर्मितीचे कामकाज करत, तेव्हा डॉ. राजेंद्रप्रसाद त्याचे अध्यक्ष होते व जेव्हा ती कायदेमंडळ म्हणून कामकाज करत तेव्हा त्याचे अध्यक्ष ग. वी. मावळणकर असत.

→ पाकिस्तान भागातील मुस्लीम लीग सदस्याचा बहिष्कार.

* इतर कार्ये.

→ भारताची कॉमनवेल्थचा सदस्यता मान्य (मे 1949)

→ राष्ट्रीय झेंडा स्वीकारला (22 जुलै 1947)

→ राष्ट्रगीत (24 जानेवारी 1950).

→ वंदे मातरमचा राष्ट्रीय गीत म्हणुन स्वीकार (24 जानेवारी 1950).

→ डॉ. राजेंद्रप्रसाद यांची राष्ट्रपती पदी निवड (24 जानेवारी 1950).

→ राज्यघटना निर्मितीचा एकूण खर्च - 64 लाख

* घटना वाचन प्रक्रिया।

→ पहिले वाचन — 4 नोव्हे 1948.

→ दुसरे वाचन — 15 नोव्हे 1948 ते 17 ऑक्टो 1949.

→ तिसरे वाचन — 14 नोव्हे - 1949.

* अंमलबजावणी.

→ घटनेच्या काही तरतुदी जसे नागरिकत्व, निवडणुका, हंगामी विधानसभा, इ. 26 नोव्हे 1949 पासुन अंमलात आल्या.

→ पुर्वरित तरतुदी ह्या 26 जानेवारी 1950 पासुन अंमलात आल्या. (त्याच दिवशी 1930 मध्ये पं. नेहरुंनी पुर्ण स्वराज्याची मागणी केली होती.)

Toppersnotes
Unleash the topper in you

# ऐतिहासिक पार्श्वभूमी

## ① Regulating Act 1773

→ कंपनीचे भारतीय कामकाजावर नियंत्रण व नियमनाचे पहिले पाऊल.

→ केंद्रीय प्रशासनाचा पाया.

→ बंगालच्या गव्हर्नरच्या अधिकारांची अनुमती व मुंबई, मद्रासच्या गव्हर्नरला दुय्यम स्थान.

→ सर्वोच्च न्यायालयाची स्थापना.

→ कंपनीच्या ~~व~~ कामगारांना खाजगी व्यापार व ~~वस्तु~~ भेटवस्तु खरेदीवर बंदी.

## ② Pitts India Act 1784.

→ 1773 च्या कायद्यातील उणिवा दुर

→ वाणिज्यिक कार्ये व राजकीय कार्ये यात भेद करण्यात आला.

→ राजकीय कार्ये (Board of control) कडे तसेच वाणिज्यिक कार्ये (court of Director)

→ कंपनीच्या क्षेत्राला ब्रिटीशांच्या ताब्यातील क्षेत्र संबोधन प्राप्त

## ③ Charter Act 1833

→ बंगालचा गव्हर्नरला भारताचा गव्हर्नर बनवण्यात आले (सर्व नागरी व सैन्यकी अधिकार)

→ ईस्ट इंडिया कंपनी व्यापारी कंपनी म्हणुन लयास गेली व फक्त प्रशासकीय संस्था म्हणुन अस्तित्व.

→ 1833 रोजी नागरी सेवेसाठी मुक्त स्पर्धात्मक प्रस्ताव.

## ④ ~~सनदी कायदा~~ Charter Act 1853.

→ गव्हर्नरच्या कौन्सिलची कायदेविषयक कार्ये व कार्यकारी कार्ये यांत भेद. व 6 नवीन सदस्याचा समावेश

→ नागरी सेवेसाठी खुली पध्दत (मेकॉले समिती)

→ कंपनी राजवटीचा कार्यकाळ वाढवला

→ केंद्रीय विधिमंडळात स्थानिक प्रतिनिधित्व देण्या

Toppersnotes
Unleash the topper in you

राणीची राजवट (1858-1947).

⑤ भारतीय सरकारचा कायदा 1858

→ गव्हर्नर च्या ऐवजी व्हॉईसरॉय ही ह्या पदाची निर्मिती (हा ब्रिटिश सरकारचा प्रतिनिधी म्हणुन काम पाहत असे).

→ Board of control आणि court of Director पद संपुष्टात

→ नवीन कार्यालय (सेक्रेटरी) ची निर्मिती व त्याकडे सर्व अधिकारांचे वाटप. तसेच तो ब्रिटिश संसदेला जबाबदार

→ 15 सदस्याचा गट सेक्रेटरीला मदत करण्यासाठी.

⑥ Indian council Act of 1861

→ भारतीय लोकांना प्रतिनिधित्व देण्यास सुरुवात (3 सदस्य नामनिर्देशित)

→ मुंबई, मद्रास प्रांतांना अधिकार देवून विकेंद्रीकरणास सुरुवात.

→

7) Morley & Minto Reform 1909

→ केंद्रीय कायदेमंडळातील सदस्य संख्येत वाढ (16 to 60)

→ भारतीय सदस्याना ठरावाच्या व उपप्रश्न विचारण्याचा अधिकार

→ सांप्रदायिक प्रतिनिधित्वला (communal Representation) सुरुवात. (मुस्लीम)

8) भारतीय सरकारचा कायदा 1919.

→ प्रांताना अधिकाराचे विभाजन करून विकेंद्रीकरणास सुरुवात.

→ प्रांतीय मंडळात कायदेविषयक ~~विभागनी~~ विभागणी

→ Transferred subject (गव्हर्नरच्या अखत्यारित मंत्र्याची सल्ल्याने)

→ Reserved subject (मंत्र्याच्या सल्ल्याशिवाय)

→ सांप्रदायिक प्रतिनिधित्वाची व्याप्ती वाढवली.

→ प्रांतिक अंदाजपत्र हे केंद्रीय अंदाजपत्रातुन वेगळे

⑨ भारतीय सरकारचा कायदा 1935.

→ अखिल भारतीय प्रशासनाची सुरुवात, ज्यामध्ये केंद्रीय कायदे, प्रांतिक कायदे, व समवर्ती कायदे
→ प्रांताना जास्त अधिकार देण्यात आली.
→ केंद्रीय स्तरावर दुहेरी सरकार स्थापन
→ सांप्रदायिक प्रतिनिधीत्वाची व्याप्ती महिला, कामगार, व SC पर्यंत वाढवली.
→ रिजर्व बॅंकेची स्थापना.

⑩ भारतीय स्वातंत्र्याचा कायदा 1947.

→ ब्रिटीश राज्य संपुष्टात.
→ भारताची विभागणी
→ व्हॉईसरॉय पदाची संपुष्टी
→ संविधानसभेस राज्यघटना निर्मितीचे अधिकार

Toppersnotes
Unleash the topper in you

# * भारतीय सरकारचा कायदा 1935.

→ अखिल भारतीय प्रशासनाची सुरुवात ज्यात केंद्रीय सुची, राज्यसुची व समवर्ती सुचीचा समावेश.

→ प्रांताना जास्त अधिकार (संघराज्याची सुरुवात)

→ गव्हर्नर हा मंत्र्याच्या सल्ल्याने कामकाज करत.

→ केंद्रीय स्तरावर दुहेरी सदनाची स्थापना.

→ द्विसभागृह – बंगाल, बॉम्बे, मद्रास, बिहार आसाम, मध्ये सुरु

- वरिष्ठ सभागृह
- कनिष्ठ सभागृह

→ सांप्रदायिक प्रतिनिधित्वाची व्याप्ती – महिला, कामगार, अनु. जाती इ.

→ सुमारे 10टक्के जनतेला मतदानाचा हक्क.

→ केंद्रीय तसेच राज्य लोकसेवा आयोगाची तरतुद.

## (10) भारतीय स्वातंत्र्याचा कायदा 1947.

→ ब्रिटीश राज्य संपुष्टात.
→ भारताची विभागणी
→ व्हॉईसरॉय पदाची संपुष्टी
→ संविधानसभेस राज्यघटना निर्मितीचे अधिकार
→ संविधान सभेस घटनानिर्मितीचे स्वातंत्र्य.
→ आदिवासी विभाग व संस्थानांना ब्रिटीश राज्यातुन मुक्ती व दोन नवनिर्मित देशात विलिन होण्याचा किंवा अलिप्त राहण्याचा पर्याय.
→ भारतीय सरकारचा कायदा 1935 मध्ये सुधारणा किंवा रद्द करण्याचा अधिकार.
→ ब्रिटनच्या राज्याचा भारताचा सम्राट ही पदवी रद्द.
→ लॉर्ड माऊंटबॅटन हा भारताचा गव्हर्नर जनरल बनला.

## राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट्ये

① सर्वात मोठी लिखित घटना :— भारतीय राज्यघटनेत मुळ – 395 कलम, 8 परिशिष्टांचा समावेश होता. कालानुसार त्यात सुधारणा करून आज रोजी 465 पेक्षा अधिक कलम व 12 परिशिष्टांचा समावेश आहे.

राज्यघटनेला एवढे विस्तृत स्वरूप हे भारताच्या भौगोलिक, ऐतिहासिक, तसेच विविधतेमुळे प्राप्त झाले.

② इतर स्रोत :— डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध देशातील घटनांचा अभ्यास करून, ~~तिथले~~ तिथल्या ~~चांगल्या~~ तरतुदी भारताला अनुसरून समाविष्ट केल्या. जसे.

मुलभुत हक्क – अमेरिका.

मार्गदर्शक तत्वे – आयर्लंड.

भारताने ह्या तरतुदी ऑस्ट्रेलिया, कॅनडा, रशिया, फ्रान्स ह्या प्रमुख देशाकडून स्विकारल्या.

तसेच भारतीय सरकारचा कायदा 1935 चा घटना निर्मिती मध्ये मोठा वाटा होता. ~~संघ~~ संघराज्य, गव्हर्नर, आणीबाणी, लोकसेवा आयोग इ. तरतुदी त्यातुन घेतल्या.

③ बदल करण्यास कठीण व लवचिक.

→ घटनेतील काही तरतुदी ह्या साध्या बहुमताने तर काही तरतुदी विशेष बहुमताने दुरुस्त करता येतात. (ज्यामध्ये राज्यांचा ही सहभाग असु शकतो.

④ एकात्मिक परंतु संघराज्य प्रणाली.

| केंद्रीय | संघराज्य |
|---|---|
| → एक राज्यघटना. | → दोन सरकार (केंद्र व राज्य |
| → एकच नागरिकत्व. | → अधिकारांचे विभाजन |
| → घटनेची लवचिकता. | → ~~घटनेचे~~ घटनेचे वर्चस्व. |
| → एकात्मिक न्यायपालिका | → द्विसदनी कायदेमंडळ |
| → आणीबाणीची तरतुद इ. | → स्वतंत्र्य न्यायपालिका इ. |

(5) संसदीय कार्यप्रणाली :— भारताने ब्रिटिश-प्रमाणे संसदीय कार्यप्रणालीचा स्वीकार केला. जो कार्यमंडळ व संसद यांच्यात समन्वय साधते.

याला Westminster Model म्हणजेच जबाबदार सरकार किंवा संसदीय सरकार म्हणतात. याची वैशिष्ट्ये —

— नाममात्र व वास्तविक अधिकारी
— बहुसंख्या पक्षाचे शासन.
— कार्यकारिणी विधिमंडळाची सामुहिक जबाबदारी.
— सभागृहाचे (लोकसभा किंवा विधानसभा) याचे विर्सजन.

भारतीय संसद प्रणाली व ब्रिटिश संसद प्रणाली यातील फरक.

→ ब्रिटीश संसदेप्रमाणे भारतीय संसद सार्वभौम नाही.

→ भारतातील निवडलेले प्रमुख (राष्ट्रपती) हे प्रजासत्ताक असतात परंतु ब्रिटन मध्ये वंशपरंपरागत राजेशाही प्रमुख आहे.

(6) धर्मनिरपेक्ष राज्य.

→ मुळ घटनेत शब्द नव्हता, परंतु एकूण घटनेच्या सारांश तसा संदर्भ देतो.

→ धर्मनिरपेक्ष शब्द 42 व्या घटनादुरुस्तीने समाविष्ट.

→ पाश्चिमात्य धर्मनिरपेक्षता ही धर्म व राज्य ह्याना एकमेकांपासुन लांब करते. परंतु भारतीय धर्मनिरपेक्षता ही सर्व धर्माना समान न्याय देते.

(7) एकेरी नागरिकत्व.

→ सांघिकप्रणाली असुनही ही एकेरी नागरिकत्व

Toppersnotes
Unleash the topper in you

**6) संसदेची सार्वभौमता व न्यायपालिकेचे स्वातंत्र्य**
→ घटनेने संसदेला व न्यायपालिकेला विशिष्ट सिमेत त्यांच्या त्यांच्या कार्याचे स्वातंत्र दिले व एकमेकात वर्चस्वाची लढाई होणार नाही याची सुद्धा काळजी घेतली.

**7) एकात्मिक परंतु स्वतंत्र न्यायपालिका.**

सर्वोच्च न्यायालय
↓
उच्च न्यायालय
↓
जिल्हा न्यायालय

→ एकात्मिक पद्धतीमुळे संपूर्ण देशात केंद्रीय व सांघिक कायद्याची अंमलबजावणी.
→ सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख काम हे मुलभुत हक्काचे संरक्षण तसेच अपील द्वारे चालते.
→ घटनेने सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी तरतुद केली आहे. जसे.
— सर्व खर्च हे एकत्रित निधी (Consolidated Fund) मधुन केले जातात.
— न्यायाधीशाचे कामकाज व त्यावर टिप्पणीस मज्जाव
— निवृत्ती नंतर खाजगी सेवेस नकार इ.

**8) मुलभुत हक्क.**
→ राजकीय लोकशाहीचा पुरस्कार.
→ कार्यकारी मंडळाच्या अनियंत्रित कारभाराला लगाम.
→ न्याय्य आहेत (मुलभुत हक्कांचे उल्लंघन झाल्यास दाद मागण्याचा अधिकार)
→ तरी ते अमर्याद नाही, कायदेमंडळ वेळोवेळी बंधन आणु शकते.
→ त्यांची अंमलबजावणी आणीबाणी वेळेस रद्द होवू शकते. (कलम 20 व 21 सोडुन).

**9) राज्याची मार्गदर्शक तत्वे.**
→ डॉ. आंबेडकरांच्या मते नवीन वैशिष्ट्ये.
→ यांचे वर्गीकरण — गांधीवादी, उदारमतवादी, व समाजवादी असे करता येते.

→ कल्याणकारी राज्य स्थापनेस उपयुक्त
→ न्यायप्रविष्ट नाहीत (उल्लंघन झाल्यास दाद मागता येत नाही).
→ मिनर्व्हा मिल्स केस मध्ये सुप्रीम कोर्टाने नमूद केले की भारतीय राज्यघटना ही मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे यात समन्वय साधणारी आहे.

(10) मुलभूत कर्तव्ये.

→ मुळ घटनेत समावेश नव्हता.
→ स्वर्ण सिंग समिती
→ 42वी घटनादुरुस्तीने 1976 मध्ये समावेश.
→ कर्तव्याची जाणीव.
→ न्यायप्रविष्ट नाहीत.

(11) आणीबाणी

→ राष्ट्रीय आणीबाणी — (कलम 352) (युद्ध व परकीय आक्रमण)
→ राष्ट्रपती राजवट (कलम 356)
→ आर्थिक आणीबाणी (कलम 360).

# घटनेची प्रस्तावना

→ प्रस्तावनेला 'घटनेची तोंडओळख' म्हणुन ओळखतात. तसेच घटनेचा सारांश सुद्धा म्हणता येईल.

→ घटनेची प्रस्तावना ही पं. नेहरूंच्या 'ठरावांची उद्दिष्टे' यावर आधारित.

→ ४२ व्या घटनादुरूस्तीने यात - धर्मनिरपेक्षता, समाजवादी, एकात्मिक (अखंडता) हे शब्द समाविष्ट.

* चार महत्वाचे घटक.

① घटनेच्या अधिकाराचा स्त्रोत :- प्रस्तावनेत असे नमुद केले की घटनेला अधिकार हे त्यांच्या लोकांकडुन मिळाले.

② राज्याचे स्वरूप :- प्रस्तावना भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक घोषित करते.

③ उद्दिष्टे :- यामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचा समावेश.

④ तारीख - २६ नोव्हेंबर १९४९.

* घटनेतील महत्वाचे शब्द :-

① सार्वभौम :-
→ याचा अर्थ भारतावर इतर कोणत्याही देशाचे वर्चस्व नाही. व भारताचे कोणावर अवलंबित्व नाही.
→ भारत स्वतःचे आंतरिक व बाह्य व्यवहार स्वतंत्रपणे चालवू शकतो.
→ जरी भारत राष्ट्रकुल राष्ट्राचा सदस्य असला, तरी त्याचा सार्वभौमत्वावर परिणाम होत नाही.
→ सार्वभौम देश या नात्याने भारत इतर देशाची जमीन विकत (भूभाग) घेवू शकतो व त्याचा भुभाग परदेशी राज्याला देवू शकतो.

② समाजवादी
→ ४२व्या घटनादुरूस्तीने शब्द समाविष्ट परंतु घटनेच्या तरतुदीत समाजवादाची सामग्री समाविष्ट.
→ भारतात 'लोकशाही समाजवाद' प्रस्थापित आहे. ज्यामध्ये 'मिश्र अर्थव्यवस्था' (खाजगी व सरकारी)

Toppersnotes
Unleash the topper in you

→ 1991 च्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारताची समाजवादी ओळख कमी केली.

③ धर्मनिरपेक्षता

→ 42 व्या घटनादुरुस्तीने समावेश. परंतु घटनेत विविध तरतुदीने सारांश / संदर्भ मिळतो. (मुलभुत हक्क 25 ते 28)

→ भारतीय धर्मनिरपेक्षता ही सकारात्मक आहे (सर्व धर्माना समान वागणुक) व सहाय्य.

④ लोकशाही

→ अप्रत्यक्ष लोकशाही - भारत, अमेरिका, ब्रिटन इ.

→ प्रत्यक्ष लोकशाही - स्वित्झर्लंड, स्वीडन इ.

→ सर्वोच्च सत्ता लोकांच्या हाती.

→ भारतीय लोकशाही ही संसदीय लोकशाही आहे, जिथे जनता त्यांचे प्रतिनिधी निवडुन देते.

→ प्रस्तावनेतील लोकशाही ही फक्त राजकीय नसुन आर्थिक व सामाजिक लोकशाहीची व्याप्ती दर्शवते.

⑤ प्रजासत्ताक → राजेशाही (वंशपरंपरागत)
→ प्रजासत्ताक (लोकांनी निवडलेले)

→ ब्रिटनमध्ये राजेशाही ही वारसाहक्काने प्राप्त होते

→ भारतात राष्ट्रपती हे लोकांमार्फत अप्रत्यक्ष निवडुन येतात.

⑥ न्याय

→ आर्थिक, सामाजिक, राजकीय न्याय.

→ सामाजिक न्यायामध्ये सर्व नागरिकांना समान वागणुक, त्यांच्या जात, पंथ, रंग, लिंग इ. वरून भेद नाही.

→ आर्थिक न्याय म्हणजे समाजातील आर्थिक असमानता संपवणे.

→ राजकीय न्याय म्हणजे सर्व नागरिकांना समान राजकीय ~~आह~~ न्याय व संधी.

→ न्यायांची संकल्पना ही 1917 च्या रशियन क्रांतीकडुन प्रेरित आहे.

## ⑦ स्वातंत्र्य

→ व्यक्तीच्या क्रियाकलापावर बंधने नसणे. तसेच त्याला वैयक्तिक व्यक्तिमत्व विकासासाठी संधी देणे.

→ प्रस्तावना ही भारतीयांना विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, उपासना याचे स्वातंत्र्य सुरक्षित करते.

→ तथापि स्वातंत्र्य म्हणजे हवे तसे वागण्याचा "परवाना" नाही. त्यावर घटनेत काही मर्यादा आहेत.

→ स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे 1789 च्या फ्रेंच राज्यक्रांतीपासून प्रेरित.

## ⑧ समानता

→ याचा अर्थ विशिष्ट एका घटकाला विशेषाधिकारांची अनुपस्थिती. व कोणत्याही भेदभावाशिवाय नागरिकांना दर्जा व संधीची समानता.

→ अनुच्छेद १४ ते १८ समानतेची व्याप्ती स्पष्ट करतात.

## ⑨ बंधुता

→ एकेरी नागरिकत्वाद्वारे बंधुत्वाच्या भावनेला प्रोत्साहन.

→ बंधुतेचा प्रसार करणे हे नागरिकांचे कर्तव्य (अनु. 51 L-A).

→ बंधुत्वाने व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व अखंडता प्रस्थापित करणे आवश्यक.

## * प्रस्तावनेचे महत्त्व

→ प्रस्तावना ही मुलभुत तत्त्वज्ञान व मुल्य यावर आधारीत.

→ ती संविधान संस्थापकांची स्वप्ने, आकांक्षा, उदात्त दृष्टी प्रतिबिंबित करते.

→ अल्लादी स्वामींच्या मते आपण इतके दिवस जे विचार व स्वप्न पाहिले यांचा सारांश म्हणजे प्रस्तावना आहे.

→ के. एम. मुन्शींच्या मते प्रस्तावना ही आमच्या सार्वभौम सत्ताधीशांची जन्मकुंडली आहे.